# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-२३/२०२५** **दिनांक- १६/०१/२०२५**

## प्रेस नोट

### Any Desk App डाऊनलोड करण्यास अनोळखी लिंक मोबाईलवर पाठवुन फसवणुक झालेल्या तक्रारदार यांना ९८,५७०/- रक्कम करण्यास सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील काशिमिरा पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्री.विरा यांना त्यांचे मोबाईलवर क्रेडिट कार्ड अपडेट करण्याकरीता अनोळखी लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी लिंकवर क्लिक केले असता त्यांचे मोबाईलमध्ये एक ॲप डाऊनलोड झाले. त्यानंतर तक्रारदार यांचे क्रेडिट कार्डाचे खात्यातुन ४८,५७०/- रु कपात झाल्याचा मॅसेज प्राप्त झाला. तसेच तक्रारदार नामे श्री. शिंदे यांचे व्हॉटअपवर ॲप डाऊनलोड करण्याबाबत लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी लिंकवर क्लिक केल्यानंतर त्यांचे मोबाईलमध्ये अनोळखी ॲप डाऊनलोड झाले. त्यानंतर तक्रारदार यांचे बँक खात्यातुन रक्कम ५०,०००/- रुपये कपात झाल्याबाबत मॅसेज त्यांना प्राप्त झाला. अश्याप्रकारे वरील तक्रारदार यांची आर्थिक फसवणुक झाल्यानंतर सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिल्याने सदरबाबत तात्काळ नोंद घेवुन **NCCRP Portal** वर ऑनलाईन तक्रार नोंदविण्यात आली.

तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक/ऑनलाईन पेमेंट गेटवे खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार यांचे खात्यातुन वर्ग झालेली रक्कमेचे पुढील व्यवहार तात्काळ थांबवुन तक्रारदार यांची रक्कम मुळ खात्यात परत मिळविण्याबाबत संबंधीतांना पत्रव्यवहार करण्यात आला.

अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी केलेल्या तात्काळ कारवाईचे अनुषंगाने उपरोक्त **तक्रारदार यांची एकुण ९८,५७०/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **अनोळखी लिंक अगर मॅसेज प्राप्त झाल्यास पडताळणी केल्याशिवाय कारवाई करु नये.**
- **अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती/ आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/स्नेहल पुणे, पोअं/ओंकार डोंगरे, सफौ/मिलाग्रिस फर्नांडिस, पोअं/सावन शेवाळे,मपोहवा/माधुरी धिंडे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**